पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९३४** **दि. ०७/०९/२०१९**

## गुन्हे शाखा पुणे शहर युनिट - ०५

## फेसबुक वरुन मैत्री झालेला मित्र निघाला अटट्ल चोर व त्याने मैत्रिणीचेच घरावर डल्ला मारुन चोरुन नेलेले मौल्यवान ऐवजांसह १२ तासांचे आत युनिट-५ कडील पोलीसांनी त्यांस केले जेरबंद

दि.०६/०९/२०१९ रोजी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे हद्यीतील धवल गिरी सोसायटी,बिबवेवाडी कोंढवा रोड,पुणे येथे दिवसा घरफोडी चोरी होवून सुमारे ३९ तोळे सोनेचे दागदागिने व ५०,०००/-रोख व चोरीतील अेटीएम मधून २५,०००/- रोख रक्कम काढून चोरीला गेलेली होती.सदरबाबत मार्केटयार्ड पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.नं.१६६/२०१९ भा.दं.वि.क. ४५४,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला होता.

सदरची घरफोडी चोरी ही दिवसां झालेली असलेने व सदर घटनांस्थळ पाहतां घरफोडी झालेले घराचे लॉक अथवा कडी कोयंडा तुटलेला नव्हता. तसेच प्लॅटचे दरवाजे कोणतेही प्रकारे उचकटलेले नव्हते. फिर्यादी यांचे कुटुंबातील सर्वजण बाहेर गेलेले असतांना फक्त एक ते दीड तासाचे कालावधीमध्ये सदरची चोरी झालेली होती. तसेच चावीचा वापर करुनच चोरी झालेचे प्रथम दर्शनी निष्पन्न झालेले होते. सदरचा तपासाचा धागा पकडून युनिटकडील अधिकारी व कर्मचारी यांना मा.वरिष्ठांचे आदेशांन्वये प्रभारी अधिकारी दत्ता चव्हाण यांनी सुचनां देवून सोसायटीचे सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले. त्यामध्ये चोरी झालेले बिल्डींगमधील कॅमेरे बंद होते. सदर सोसायटीचे मेनगेटचा कॅमेरा देखील बंद होता. त्यामुळे तपास माहिती मिळणेस अवघड झालेले असतांना युनिटकडील अधिकारी व कर्मचारी यांनी सोसायटीतील एका बंगल्याचे बाहेरचे सीसीटीव्ही कॅमेरेचे फुटेजवरुन सशयित इसमाची छबी प्राप्त केलेली होती. सदर छबीनुसार सदर इसमांबाबत तपास करीत असतांना स्थानिकांकडे व सोसायटीचे वॉचमन यांचेकडे चौकशी केली असतां,सदरचा इसम फिर्यादी यांचे पत्नीचे ओळखीचा असलेचे निष्पन्न झाले व सोसायटीत तो यापुर्वी ही एक दोन वेळा आलेची माहिती समोर आली. सदर माहितीचा धागा पकडून केलेल्यां चौकशीमध्ये फिर्यादी यांची पत्नीची व सदर इसमाची फेसबुक वरुन मैत्री झालेली असलेचे निष्पन्न झाले म्हणून फेसबुकवरुन त्याची संपूर्ण उपयुक्त माहिती जमा करणेत आली. सदरच्या इसमाने फेसबुकवरील झालेल्यां मैत्रीचा फायदा घेवून आरोपी फिर्यादी यांच्या घरी दोन वेळा येवून गेलेला होता. त्यावेळी त्याने त्यांचे घराचे मुख्य दरवाज्याच्या चाव्यां चोरुन नेलेल्यां होत्या. आरोपीबद्यल खात्री लायक माहिती मिळालेनंतर युनिट-५ कडील पो.उप.निरी.शेंडगे व स्टाफ त्वरीत आरोपीचे मूळ पत्त्यांवर शाहुपुरी,सातारा येथे पाठविणेत आले. आरोपी वापरत असलेले मोबाईल नंबर प्राप्त करणेत आलेले होते. त्याचे आधारे त्याचे जवळचे मित्र यांना टिमने ताब्यांत घेतले व त्याआधारे आरोपी नामेः- निलेश शरद तावरे,वय २९ वर्षे,धंदा-काही नाही रा.द्वारा-शंकर देवरे,अक्षय निवास अपार्टमेंट,प्लॉट नं.३६,आर.के.शाळा नगर,शाहुपुरी,गजानन मंदिरासमोर,सातारा यांस पकडणेत आलेले आहे.

सदरचा आरोपी हा पोलीस अभिलेखांवरील अटट्ल चोर असून त्याचेवर ३३ गुन्हे वेगवेगळयां पोलीस स्टेशनला व वेगवेगळयां जिल्हयांत १५ वाहन चोरीचे,०६ घरफोडी चोरी,०२ जबरी चोरी,०१ दरोडयाची तयारी असे दाखल असून त्यामध्ये त्यांस अटक झालेली आहे. तपासांमध्ये आरोपीचे ताब्यांत चोरी गेलेले मालांपैकी ३० तोळे,जवळजवळ ०१ किलो चांदी,०१ चोरी केलेली मोटार सायकल,रोख रक्कम,तिन मोबाईल हॅन्डसेट असा एकूण किं.रु.११,९३,६५८/- चा ऐवज आरोपीकडून जप्त करुन हस्तगत करणेत आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.अशोक मोराळे साहेब,अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर मा. श्री. बच्चन सिंह साहेब,पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर, मा.श्री.शिवाजी पवार साहेब, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे शहर यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी वपोनि श्री.दत्ता चव्हाण,पो.उप-निरी.सोमनाथ शेंडगे,पोलीस स्टाफ संतोष मोहिते,महेश वाघमारे,दत्तात्रय काटम, अमजद पठाण,राजेश रणसिंग,राजभाऊ भोरडे,बडू शिंदे,प्रदीप सुर्वे,सचिन घोलप,दया शेगर,प्रमोद गायकवाड, प्रविण काळभोर यांनी ही कामगिरी केलेली आहे.